**MHST**050000131986

# ३रे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड, जि. सातारा यांचे न्यायालयात.

(श्री. किरण रा. खोंद्रे यांचे समोर)

**नि.दि.मु.क्र.५७६/१९८६**

| | | |
|---|---|---|
| १. | जगन्नाथ राजाराम पाटील व इतर. | **वादी.** |
| | *विरुध्द* | |
| १. | उषादेवी मोहनराव पाटील व इतर. | **प्रतिवादी.** |

## वादींतर्फे नि.१८५, १८७, १८९ वर दाखल अर्जांवर संयुक्तिक आदेश.

**(०१)** अर्ज नि.१८५ नुसार वादींची विनंती की, वादी क्र.१अ जगन्नाथ राजाराम पाटील हे दि.२९/०४/२०२६ रोजी मयत झाले असल्याचे नुकतेच समजल्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता कायद्याने उशीर झाला (अंदाजे १६ दिवसांचा उशीर), या कारणास्तव झालेला उशीर माफ होवून मिळणेची विनंती वादी अर्ज नि.१८५ अन्वये करत आहे.

**(०२)** अर्ज नि.१८७ नुसार वादींची विनंती की, वादी क्र.१अ हे मयत झाले असून, विहीत मुदतीत त्यांचे वारस अभिलेखावर घेतले नाहीत या कारणास्तव वादी क्र.१अ यांचेविरुध्द दावा अबेट/निरस करण्यात आला असून, तो अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेची विनंती वादी अर्ज नि.१८७ अन्वये करत आहे.

**(०३)** अर्ज नि.१८९ नुसार वादींची विनंती की, वादी क्र.१अ जगन्नाथ राजाराम पाटील हे दि.२९/०४/२०२६ रोजी मयत झाले असून, वादी क्र.१अ

यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मिळणेची विनंती वादी अर्ज नि.१८९ अन्वये करत आहे.

**(०४)** वादींचे कथन असे की, प्रस्तुतचा दावा वाटप व कब्जा तसेच इतर कारणांकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. वादी क्र.१अ हे मयत झाल्याची माहीती वादींना नुकतीच समजली. त्यानंतर वादी क्र.१अ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता अलाहीदा अर्ज देखील सादर केलेला आहे. वादी क्र.१अ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता वादींनी जाणूनबूजून उशीर केलेला नाही. वादींनी मयत वादी क्र.१अ यांचा मृत्युचा उतारा कागदयादी नि.१९२ लगत दाखल केलेला आहे आणि त्या अनुषंगाने शपथपत्र देखील दाखल केलेले आहेत. सदरहू तीनही अर्ज मंजूर न झाल्यास, वादींना न्यायहक्कांपासून वंचित रहावे लागेल व त्यामुळे वादींचे नुकसान होणार आहे. उलटपक्षी प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही आणि प्रतिवादींना आपले जादाचे म्हणणे/कैफियत देणेची संधी मिळणार आहे. तसेच न्यायालयास मुळ दावा निर्णीत करणेस मदतच होणार आहे. त्यामुळे, अर्ज नि.१८५ व १८७ या दोनही अर्जांवर आदेश होऊन नि.१८९ हा अर्ज मंजूर करुन, त्या अनुषंगाने मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती वादी करत आहेत.

**(०५)** प्रतिवादींनी नि.१८५ वरील अर्जावर म्हणने देऊन हरकत घेतली आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जामध्ये नेमका किती दिवसांचा उशीर झाला आहे याचा उल्लेखच अर्जात नाही. सबब तो नामंजुर करावा. असे असले तरी

निशाणी १८७ व १८९ वर प्रतिवादी यांनी, योग्य ते आदेश पारीत करावेत, असे म्हणणे दिलेले आहे.

**(०६)** वादी व प्रतिवादींतर्फे वकीलांचा युक्तीवाद, वर नमुद तीनही अर्जातील कथने, त्यावरील म्हणणे, ॲफिडेव्हीट आणि दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मुळ दावा हा वाटप व कब्जा करिताचा आहे. वादींच्या कथनानुसार वादी क्र.१अ हे मयत झाल्याबाबतची माहिती वादींना वेळेत मिळाली नाही. या सर्व तथ्यांचा विचार करता आणी वादींकडुन जाणते अजाणतेपणी झालेल्या अंदाजे १६ दिवसांच्या विलंबाचा विचार करता, प्रस्तुतचे तिन्ही अर्ज द्रवयदंडावर मंजुर करणे योग्य होईल असे माझे मत आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. निशाणी क्र.१८५, १८७ आणी १८९ वरील अर्ज प्रत्येकी रक्कम ₹.२००/- (रुपये दोनशे मात्र) च्या द्रव्यदंडावर मंजूर करण्यात येतात.

२. वादी यांनी दंडाची रक्कम प्रतिवादींना द्यावी नसता या आदेशाचा अंमल होणार नाही.

३. निशाणी क्र.१८९ नुसार वादींनी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन, पुढील नेमले तारखेपर्यंत दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखामध्ये हजर करावी.

KIRAN RAJARAM KHONDRE
Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2026.08.14 17:04:59 +0530

कऱ्हाड. (किरण रा. खोंद्रे)

दि.१४/०८/२०२६ ३रे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,कऱ्हाड.